**<u>ठळक बातम्या</u>**

- पावसाळी अधिवेशनात तब्बल ९७ हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या पुरवणी मागण्या सादर

- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा खासदारांचा मुंबईत एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश

- उत्तरप्रदेशात लखनौमध्ये कोचिंग सेंटरला लागलेल्या आगीत १४ विद्यार्थ्यांचा मृत्यू

- वैद्यकीय पदवी प्रवेशाच्या नीट फेरपरीक्षेदरम्यान गैरप्रकार करण्याच्या प्रयत्न करणाऱ्या २८ जणांना बिहारमधून अटक, पेपर फुटल्याचा दावा NTA नं फेटाळला

**आणि**

- युकेचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांचा राजीनामा

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी आज एकंदर ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर सादर झाल्या. यात सर्वाधिक, २० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी करण्यात आली आहे. त्याखालोखाल १० हजार ७ कोटी १० लाख रुपयांची तरतूद केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत बिनव्याजी कर्जासाठी केली आहे. विकसित भारत जी-राम-जी योजनेसाठी केंद्र आणि राज्याचा हिस्सा ७ हजार ३६७ कोटी ३२ लाख रुपये इतका आहे, तर सिंहस्थ कुंभमेळ्याचं नियोजन आणि अंमलबजावणीसाठी ३ हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद आहे.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा खासदारांनी आज मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. संजय दिना पाटील,

ओमप्रकाशराजे निंबाळकर, भाऊसाहेब वाकचौरे, संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर आणि संजय जाधव यांचा यात समावेश आहे.

हे खासदार बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांच्या खऱ्या शिवसेनेत सामील झाले असून प्रवेशाची प्रक्रिया कायद्यानुसारच झाल्याचं एकनाथ शिंदे यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं. या सर्व खासदारांच्या मतदारसंघातले प्रश्न सोडवले जातील, विकासनिधी कमी पडू दिला जाणार नाही, खासदार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना सन्मानाने वागवलं जाईल, अशी हमी शिंदे यांनी खासदारांना दिली. तसंच सहा खासदारांच्या प्रवेशामुळे शिवसेना राज्यात भक्कम होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

- **- -होल्ड बाईट शिंदे - - -**

या खासदारांच्या प्रवेशाच्या मुद्द्यावरुन माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी टीका केली आहे. ते म्हणाले.

- **- होल्ड - आदित्य बाइट - -**

दरम्यान, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे शनिवारपासून ३ दिवस या खासदारांच्या यवतमाळ, वाशिम, हिंगोली, परभणी, धाराशिव आणि शिर्डी या लोकसभा मतदार संघांचा दौरा करणार आहेत.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या अकरा जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले. अकरापैकी दहा जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले असून नाशिकच्या एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला, तर सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडले गेले, त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींद्वारे निवडल्या जाणाऱ्या विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीत १७ पैकी १६ जागा जिंकत महायुतीने दणदणीत विजय मिळवला आहे. महाविकास आघाडीला एकही जागा जिंकता आली नाही.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशात लखनौ मध्ये अलीगंज इथं आज दुपारी एका कोचिंग सेंटरमध्ये लागलेल्या आगीत १४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले विद्यार्थी १६ ते १८ वयोगटातले होते. अलीगंजमध्ये पुरनिया भागात एका इमारतीत हे कोचिंग सेंटर चालवलं

जात होतं. या दुर्घटनेत ७ जण जखमी झाले असून, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेत झालेल्या जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला आहे. केंद्र सरकारनं प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या नातेवाईकांना 2 लाख रुपये आणि जखमींना 50 हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. राज्य सरकारनंही आर्थिक मदत जाहीर केली आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली तसंच रुग्णालयात दाखल असलेल्या जखमींची विचारपूस केली. मृतांच्या कुटुंबियांना त्यांनी ५ लाख आणि जखमींना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. याप्करणी चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

**<><><><>**

गेल्या २४ तासात झारखंड मध्ये वीज कोसळून ११ जण मृत्युमुखी पडले आहेत. मृतांमध्ये खुंटी जिल्ह्यातल्या ४, रामगड जिल्ह्यातल्या २, लोहारडाग, देवघर, जामतारा, साहिबगंज तसंच गिरिधी जिल्ह्यातल्या प्रत्येकी एकाचा  समावेश आहे.

**<><><><>**

बिहारमध्ये नीट यूजी फेरपरीक्षेत गैरप्रकार करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी २८ जणांना अटक झाली आहे. देशभरात काल कडक बंदोबस्तात ही फेरपरीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत बायोमेट्रिक पडताळणी प्रक्रियेत फेरफार करून बनावट उमेदवार बसवल्याच्या आणि मध्यस्थांशी संगनमत केल्याच्या आरोपावरून या प्रक्रियेशी संबंधित १८ कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली. तर नोंदणीकृत उमेदवारांच्या वतीने परीक्षा देण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून लखीसराय इथून  ९ जणांना अटक करण्यात आली. तसंच, गया वैद्यकीय महाविद्यालयाशी संबंधित एका मधस्थालाही पोलिसांनी अटक केली आहे.

**<><><><>**

नीट फेरपरीक्षेत पुन्हा पेपर फुटल्याच्या वृत्ताचा एनटीए, अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं इन्कार केला आहे. नीट फेरपरीक्षा २०२६ चा पेपर टेलिग्राम या समाजमाध्यम मंचावर परीक्षेआधी फुटल्याची चर्चा होती. मात्र कालची परीक्षा सुरक्षित आणि गैरप्रकारमुक्त वातावरणात पार पडल्याचं एनटीएने म्हटलं आहे. या प्रकरणी जबाबदार व्यक्तींविरोधात

कारवाई केली जाईल. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र आणि इतर यंत्रणांच्या मदतीनं या प्रकाराचा तपास सुरु आहे. विद्यार्थी आणि पालकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, कोणतीही माहिती नीट परीक्षेच्या www.neet.nta.nic.in या संकेतस्थळावर पडताळून पहावी असं आवाहन एनटीएने केलं आहे.

<><><><><>

ज्या विद्यार्थ्यांचे इयत्ता बारावीचे गुण पडताळणी किंवा पुनर्मूल्यांकनानंतर बदलले आहेत, त्यांच्या सुधारित गुणपत्रिका योग्य वेळी सीबीएसईच्या प्रादेशिक कार्यालयांमध्ये उपलब्ध करून दिल्या जातील, असं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. सुधारित गुणपत्रिका मिळण्यापूर्वी उमेदवारांना त्यांच्या जुन्या मूळ गुणपत्रिका जमा कराव्या लागतील. अद्ययावत गुणपत्रिका डिजीलॉकर खात्यातही उपलब्ध असून पुढच्या सर्व प्रक्रियांसाठी ती वैध असल्याचंही बातमीत म्हटलं आहे.

<><><><><>

यूकेचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. मजूर पक्षाचं प्रमुखपदही त्यांनी सोडलं असून, आज १० डाऊनिंग स्ट्रीट इथल्या निवासस्थानी त्यांनी चाहत्यांच्या उपस्थितीत ही घोषणा केली. ब्रिटीश पार्लमेंटचं अधिवेशन येत्या सप्टेंबरमधे सुरु होणार असून त्या आधी नवीन नेत्याची निवड होईपर्यंत आपण पदाचा कार्यभार सांभाळणार असल्याचं स्टार्मर यांनी जाहीर केलं. राजे चार्ल्स यांना आपला निर्णय कळवला असल्याचं त्यांनी सांगितलं. अलिकडेच पोटनिवडणूक जिंकणारे अँडी बर्नहॅम हे स्टार्मर यांची जागा घेतील असं मानलं जातं. जेफ्री एपस्टीनबरोबर कथित संबंध असलेले पीटर मन्डेल्सन यांची नेमणूक अमेरिकेत राजदूत म्हणून करण्याचा स्टार्मर यांचा निर्णय सर्वात वादग्रस्त ठरला.

<><><><><>

व्हॉट्सअपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी कुणाल शहा या भारतीय व्यक्तीची नियुक्ती झाली आहे. मेटाचे प्रमुख मार्क झुकेरबर्ग यांनी ही घोषणा केली. कुणाल शहा यांनी भारतात क्रेड या कंपनीची स्थापना केली होती. या कंपनीत मेटा सुमारे साडे ८ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे.

<><><><><>

नवी दिल्ली इथं आयोजित ब्रिक्स देशांच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या १६ व्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर, इराणचे संरक्षण उप-मंत्री गदीर निझामीपोर यांनी आज राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी यावेळी पश्चिम आशियातल्या सद्यःस्थितीचा आढावा घेतला. ब्रिक्स व्यासपीठाच्या माध्यमातून सहकार्य आणि भारत-इराण द्विपक्षीय भागीदारीवरही त्यांनी चर्चा केली.

**<><><><><>**

कतारमध्ये गॅस निर्यातीच्या एका प्रमुख केंद्रावर झालेल्या स्फोटात १३ जणांचा मृत्यू झाल्याचं कतारच्या उर्जा मंत्र्यांनी सांगितलं आहे. अमेरिका-इराणमधल्या युद्धबंदीच्या वाटाघाटी दरम्यान कतारने आपलं निर्यात केंद्र पुन्हा सुरू करण्याचं काम हाती घेतलं होतं. मात्र, काल रात्री हे काम सुरू असतानाच बरझान गॅसपुरवठा केंद्रावर ही दुर्घटना घडली.

**//<><><><><>//**